# परमाणु ऊर्जा केंद्रीय विद्यालय क्र. 3, मुंबई

## सराव परीक्षा (2024-25)

इयत्ता - 9 वी  विषय - मराठी (2L )

वेळ - 1.30 तास  गुण - 40

..........................................................................................................................................

प्रश्न १) खालील उतारा वाचून त्यावर आधारित प्रश्नांची उत्तरे लिहा.

शरीर हे सर्वश्रेष्ठ धन आहे. जीवन सुंदरतेने आनंदाने व्याधीरहीत, निरोगी जगण्यासाठी उत्तम शरीराची साथ हवी. शरीर व मन कार्यक्षम असणे, शरीरात जोम आणि मनात उत्साह असणे, जीवनात सुख असणे यावर मानसिक आरोग्य अवलंबून असते. मानसिक आरोग्य सर्वोत्तम राहण्यासाठी मन आनंदी, उत्साही, निखळ, निर्मळ, प्रसन्न व निकोप ठेवावे लागते.उत्तम शरीर राखण्यासाठी नित्यनियमाने व्यायाम घेण्याची आवश्यकता आहे. अती नको -मित हवे, अति खाणे , अति खेळणे ,अति आराम ,अति संभाषण ,अति ताण साऱ्या गोष्टी टाळायला हव्यात. मितभाषी माणूस आपला आब राखून असतो. तो मोजकेच बोलतो.स्मित हास्य करणारा लक्ष वेधून घेतो. मिताहार असणारी व्यक्ती शारीरिक व मानसिक दृष्ट्या ठणठणीत असते .आहार चौरस ,सकस मित हवा. आहार संपन्न व सुदृढ जीवनासाठी आहे हे लक्षात असू द्यावे.

१)माणसाची मानसिक आरोग्य कशावर अवलंबून असते ? (1)

२) रिकाम्या जागी योग्य पर्याय निवडा. (1)

मितभाषी माणूस म्हणजे.........

अ) मोठ्याने बोलणारा ब) मोजकेच बोलणारा क) कधी न बोलणारा

३)उताऱ्यावरून शरीर सुदृढ होण्याकरिता काय करावे ? (1)

४)आरोग्यासाठी आपण खालीलपैकी कोणत्या गोष्टी टाळायला हव्यात ?(1)

५)उतारयात सांगितल्याप्रमाणे कोणता मनुष्य लक्ष वेधून घेतो? (1)

६)तन या शब्दासाठी उतार खालीलपैकी कोणता समानार्थी शब्द आला आहे. (1)

अ) सदृढ ब) शरीर क) संपन्न

७)विरूद्धार्थी शब्द लिहा. (कोणतेही- २) (2)

अ) सर्वश्रेष्ठ × ........ ब) उत्साह ×...........

क)आनंदी ×............

प्रश्न 2) सूचनेप्रमाणे लिहा.

१) अधोरेखित शब्दाचा विरुद्धार्थी शब्द लिहून वाक्य पुन्हा लिहा. (2)

अ) आजी माझ्या <u>जवळची</u> होती.

आ) शेतकरी फार <u>सुखी</u> आहे.

२) काळ ओळखा. (2)

अ) मी नागपूरला जाणार आहे.

आ) भारत उदया पहिला सामना खेळेल.

३) क्रियापद ओळखा .

शिक्षक वर्गात शिकवतात. (1)

४) खालील वाक्यातील सर्वनाम लिहा.

१) शेतकरी आत्महत्या करतो पण त्याच्या पत्नीने आत्महत्या केल्याचे ऐकवत नाही. (1)

५) वचन बदला. (कोणतेही -२) (2)

अ) चष्मा -........... आ) बादली-........

इ) बाहुली-..............

६) समानार्थी शब्द लिहा. (कोणतेही- २) (2)

अ) आश्चर्य=.......... आ) बारसे=.........

इ) स्तिमित=.............

७) मला गोड खाणे आवडते .(नकारार्थी वाक्य बनवा ) (1)

८)मुलांनो शाळेत शिस्तीत रहा. (वाक्य प्रकार ओळखा)

९) आमरण या सामासिक शब्दाचा विग्रह करून कोणत्या प्रकारचा समास आहे ते लिहा . (1)

१०)त्रिभुवन या सामासिक शब्दाचा विग्रह करून कोणता समास आहे ते लिहा. (1)

११) खालील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा व वाक्य पुन्हा लिहा. (नाराज होणे, माया देणे, वचक असणे) ( कोणतेही- २) (2)

अ) दरारा असणे आ) हिरमुसले होणे इ) प्रेम देणे

प्रश्न 3) रिकाम्या जागी योग्य पर्याय निवडा.( कोणतेही -५) (5)

१) सखुआजीचा............मला खोलवर जखम करून गेला.

अ) मृत्यू ब) शब्द क) कविता ड) बोलणे

२) भारतात येणारे श्वेतबलाक............येतात.

अ) चीन ब) जपान क) जर्मनी ड) केरळ

३) शिमग्याच्या धुडवळीला आमच्या वस्तीतील..............तमाशाचा फड उभा राहिला.

अ) वर्गात ब) प्रौढ वर्गात क) बाल वर्गात ड) किशोर वर्ग

४) आपल्या ज्ञानविषयक गरजा मराठीतून भागवण्यासाठी...........पहावा.

अ) ग्रंथ ब) फळा क) विश्वकोश ड) शब्दार्थ

५) लेखक सातारा जिल्ह्यातील ..............ला जायच्या विचारात होते.

अ)औंध ब) खडक पाडा क) जलम ड) दौंड

६) वटी पोटाला ............ उभारले

वटी पोटाले बांधते झोयी काठीला टांगते.

अ) विष्णू ब) लक्ष्मी क) गंगा ड) पाराबती..

प्रश्न 4) एका वाक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही- ५) (5)

१) मराठी विश्वकोशाच्या निर्मितीमध्ये पहिले संपादक म्हणून कोणाचे योगदान अत्यंत मोलाचे आहे?

२) कोणत्या खेळात जातपात मानली जात असे?

३) नंदी बैलाच्या जोडीला कोण हाकलते?

४) पक्ष्यांच्या स्थलांतराची मूळ प्रेरणा कोणती?

५) सखु आजी किती वर्षाची होती?

६) गिर्यारोहकाच्या मागे कोणता पक्षी जातो?

७) श्री. गोळीवडेकर कोण होते?

आ) खालीलपैकी अधोरे तिकीट संकल्पना स्पष्ट करा.( कोणतेही -१)   (1)

१) काया ढेकलात डोया हिर्व सपन पाहेते.

२) काकरात बिजवाई जस हासंर चादनं.

प्रश्न 5) (खालील प्रश्नांची उत्तरे सविस्तर लिहा.(कोणतेही-३)   (6)

१) विश्वकोशाचा उपयोग  लिहा.

२) पक्षाच्या स्थलांतराची वैशिष्ट्ये लिहा.

३) सखु आजीचा गोतावळा  स्पष्ट करा.

४) तिफन कवितेतून कवीने कशाचे वर्णन केले आहे?

५) खालील वाक्याचा संदर्भासहित अर्थ स्पष्ट करा.

शाळेच्या 'बागा' लेखकांसारख्या मुलांच्या जीवावर उभ्या होत्या.

६) फक्त ॲल्युमिनियमचेच वाळे पक्षांच्या पायात अडकवतात कारण लिहा.